अभिनेते, दिग्दर्शक राकेश रोशन यांना कॅन्सर



मुंबई : ज्येष्ठ अभिनेते, निर्माता, दिग्दर्शक राकेश रोशन यांना कॅन्सर झाल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यांचा मुलगा अभिनेता हृतिक रोशन याने इन्स्टाग्रामवरून भावनिक पोस्ट टाकून याबाबतची माहिती दिली आहे. हृतिकने वडिलांसोबत जिममध्ये व्यायाम करतानाचा एक फोटो पोस्ट केला आहे. कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराने त्रस्त असताना राकेश रोशन मोठ्या हिमतीने झुंज देत आहेत, अशा आशयाचा एक संदेश हृतिकने पोस्ट केला आहे. सर्जरीचा दिवस असला तरी राकेश रोशन जिमला जाणं चुकवणार नाहीत याची खात्री होती, मी ओळखत असलेल्या व्यक्तीपैकी माझे बाबा हे सगळ्यात सक्षम व्यक्ती आहेत. त्यांना प्राथमिक स्थितीतील स्क्वैमस सेल कार्सिनोमा (त्वचेचा कर्करोग) झाल्याचं निष्पन्न झालं आहे. कर्करोगाशी सामना करण्यासाठी ते पूर्णपणे सज्ज आहेत. एक कुटुंब म्हणून अशी खमकी व्यक्ती घरात असणं हे मी माझं भाग्य समजतो, असं हृतिकनं लिहिलंय.

फौजदारी गुन्हे सिद्ध करणारे डीएनए तंत्रज्ञान विधेयक लोकसभेत मंजूर

नवी दिल्ली, दि. ८ (वृत्तसंस्था) – फौजदारी गुन्ह्यात उपयुक्त असणारे अत्याधुनिक डीएनए तंत्रज्ञानवापराला परवानगी देणारे डीएनए विधेयक आज लोकसभेने मंजूर केले. यामुळे गुन्हेगार, पीडित, संशयीत, कच्चे कैदी यांच्यासह अनेक व्यक्तींची ओळख तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सिद्ध करता येणार आहे.

डीएनए तंत्रज्ञान (वापर आणि अंमलबजावणी) नियमन विधेयक २०१८ लोकसभेत सादर करण्यात आले. यामुळे गुन्हेगारी आणि दिवाणी प्रकरणे, मानवी अवयव प्रत्यारोपण, इमिग्रेशन आदी ठिकाणी डीएनए तंज्ञत्रान वापरता येऊ शकेल.

या विधेयकावरील चर्चेला उत्तर देताना विज्ञान आणि तंत्रज्ञानमंत्री हर्षवर्धन यांनी डीएनए टेस्टिंगचे प्रमाण अत्यंत अल्प असल्याचे सांगितले. या विधेयकाचा गैरवापर होण्याबद्दल बोलताना त्यांनी कोणत्याही गोष्टीचा गैरवापर होऊ शकतो, असे मत व्यक्त केले. चाचण्यासाठी लॅबोरेटरीकडून गोळा केल्या जाणाऱ्या रक्ताच्या नमुन्यातूनही गैरव्यवहार होऊ शकतो, असे हर्षवर्धन म्हणाले.

डीएनए तंत्रज्ञान विधेयक

■ या विधेयकात नॅशनल डीएनए (डिऑक्सिरीबोन्यूक्लिक ॲसिड) बँक आणि रिजनल डीएनए बँका उभारण्याची तरतूद आहे. ■ प्रत्येत डाटा बँकेत गुन्हेगारी व्यक्ती, संशयीत आणि आरोपींची अनुक्रमणिका (इंडेक्स) जतन केली जाणार आहे. ■ जेव्हा एखाद्या गुन्ह्याचा तपास अथवा बेपत्ता व्यक्तींचा शोध घेण्यासाठी डीएनए टेस्टिंग केले जाणार असेल तेव्हा व्यक्तीची परवानगी घेऊन चाचणी केली जाईल. ■ डीएनए तंत्रज्ञानामुळे गुन्हेगारी व दिवाणी न्यायप्रक्रियेत आमूलाग्र बदल होईल, लोकांना त्याचा फायदा होईल, असे तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी यांनी सांगितले. ■ लोकांच्या डीएनए प्रोफाईलचा गैरवापर होऊ नये, असे आरएसपीचे खासदार एन. के. प्रेमचंद्रन यांनी स्पष्ट केले.

पॉक्सो कायदा दुरुस्ती विधेयक सादर

मुलांचे शोषण करणाऱ्यास फाशीच्या शिक्षेची तरतूद

नवी दिल्ली : मुलांवर लैंगिक हल्ले करणाऱ्यास फाशीच्या शिक्षेची तरतूद करणारे पॉक्सो कायदा दुरुस्ती विधेयक आज केंद्र सरकारने लोकसभेत सादर केले. १८ वर्षांखालील मुलांवरील लैंगिक हल्ले, लैंगिक छळणूक, पोर्नोग्राफी यास प्रतिबंध करणारे, तसेच बालकांवरील गुन्ह्यांचे खटले चालविण्यासाठी विशेष न्यायालये स्थापन करण्याची तरतूद या विधेयकात आहे. या पॉक्सो दुरुस्ती कायद्यातील कलम ४,५, ६ नुसार आरोपीला कडक शिक्षेची तरतूद केली आहे. चाइल्ड पोर्नोग्राफी मटेरियल वापरणाऱ्यासाठी ३ वर्षे शिक्षेची, तर लैंगिक हल्ला करणाऱ्यास फाशीच्या शिक्षेची तरतूद सदर विधेयकात आहे. देशातील मुलांच्या बालपणाचे योग्य संरक्षण करून त्यांना सुदृढ बालपण मिळावे यासाठी कडक कायद्याची तरतूद या विधेयकात सरकारने केली आहे.

थोडक्यात

सिमलामधील हिमालयन क्वीन टॉय ट्रेनच्या इंजिनला आग

सिमला : सिमला शहराकडे जाणाऱ्या हिमालयन क्वीन टॉय ट्रेनच्या इंजिनला हिमाचल प्रदेशातील धरमपूर आणि कोटी रेल्वे स्थानकादरम्यान आज दुपारी आग लागली. या घटनेत कोणीही जखमी झाले नसल्याचे रेल्वेचे अंबाला विभागाचे व्यवस्थापक दिनेशचंद्र शर्मा यांनी सांगितले. दुपारी २.२५ वाजता टॉय ट्रेनच्या इंजिनला आग लागल्याचे वृत्त कळाले. रेल्वे कर्मचाऱ्यांनी थोड्या वेळातच आग आटोक्यात आणली. यानंतर नवे इंजिन घटनास्थळी पाठविण्यात आल्यावर ट्रेन शिमलाकडे रवाना झाली. या घटनेची चौकशी करण्याचे आदेश रेल्वे प्रशासनाने दिले आहेत. सिमला ते कालका स्थानकादरम्यान नॅरोगेज रेल्वेमार्गावरून हिमालयन क्वीन टॉय ट्रेन दररोज धावते.

सुवर्णमंदिरात फोटोग्राफी, व्हिडीओ शूटिंगला बंदी

अमृतसर : पंजाबमधील शीख धर्मीयांचे प्रमुख धार्मिक स्थळ असलेल्या अमृतसरमधील सुवर्णमंदिर परिसरात फोटोग्राफी आणि व्हिडीओ शूटिंगला बंदी करण्यात आली आहे. सुवर्णमंदिराचे व्यवस्थापन पाहणाऱ्या शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीने यासंदर्भात सुवर्णमंदिरात नोटीस लावली आहे. पर्यटक आणि भाविकांनी सुवर्णमंदिर परिसरात फोटो काढू नयेत, तसेच व्हिडीओ शूटिंग करू नये, असे नोटीसमध्ये म्हटले आहे. सुवर्णमंदिरातील धार्मिक व आध्यात्मिक वातावरणाला बाधा पोहोचू नये म्हणून हा निर्णय घेतल्याचे समितीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. सुवर्णमंदिरात दररोज हजारो भाविक आणि पर्यटक येत असतात. या निर्णयामुळे सुवर्णमंदिराच्या पार्श्वभूमीवर सेल्फी घेण्याची संधी आता पर्यटकांना उपलब्ध होणार नाही.

शिवसेनेसोबतच्या युतीबाबत राज्यातील भाजपचे नेते आशावादी

मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी) – युती होईल की नाही यात कार्यकर्त्यांनी पडू नये. आपल्यासोबत जे येणार नाहीत त्यांना विरोधकांप्रमाणे उखडून देऊ असे वक्तव्य भाजपाध्यक्ष अमित शहा यांनी केले असले तरी राज्यातील भाजपचे नेते अजूनही शिवसेनेसोबतच्या युतीबाबत आशावादी आहेत. शिवसेनेसोबत युती होईल असा विश्वास अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.

लातूरमध्ये भाजप कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलताना अमित शहा तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वबळावर लढण्याची भाषा केली होती. जे आपल्यासोबत येतील त्यांना घेऊन निवडणूक लढू, पण जे येणार नाहीत त्यांना विरोधकांप्रमाणे उखडून फेकू असे वक्तव्य अमित शहा यांनी केले होते. पण राज्यातील भाजपचे नेते शिवसेनेसोबत युती करण्याबाबत अजूनही अनुकूल आहेत. मंत्रालयात पत्रकारांशी बोलताना अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी शिवसेनेसोबत युती करायला आम्ही शंभर टक्के तयार आहोत. शिवसेनेसोबत युती होईल असा विश्वास त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. राज्याचे महसूलमंत्री चंद्रकांत पाटील यांनीही युतीची बोलणी संपली नाहीत असे सांगितले. युतीबाबत पत्रकारांनी विचारले असता युतीची बोलणी संपल्याचे तुमच्यामार्फतच समजते, असे चंद्रकांत पाटील पत्रकारांना उद्देशून म्हणाले. युतीची बोलणी कधीही सुरू होऊ शकतात असे सूचक वक्तव्य करून युतीबाबत आशावाद व्यक्त केला.

यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सुधीर मुनगंटीवार तसेच चंद्रकांत पाटील यांनी युतीसाठी आम्ही सकारात्मक असल्याचे वक्तव्य केले होते. आगामी निवडणुकीत मतांचे विभाजन होऊ नये म्हणून शिवसेना-भाजप युती होणे गरजेचे आहे. आम्ही एकत्र लढलो तर काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या पायाखालची जमीन सरकेल. त्यामुळे शिवसेनेशी युती करण्यासाठी आम्ही पुढाकार घेऊ, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका खासगी टीव्ही चॅनेलच्या कार्यक्रमात बोलताना सांगितले होते. तर आगामी निवडणुकीत शिवसेनेसोबत युती करायची ही आमची स्पष्ट भूमिका आहे. शिवसेनेशी आमची बोलणी यशस्वी होतील. पुढील निवडणुकीत युतीचाच झेंडा फडकेल, असा विश्वास यापूर्वी राज्याचे अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला होता. मात्र लातूरमध्ये अमित शहा यांनी स्वबळावर निवडणुका लढवण्याची भाषा केली असली तरी राज्यातील नेते युतीबाबत आग्रही असल्याचे दिसते.

...तर गाडून टाकू!

महाराष्ट्रात येऊन कोणीही शिवसेनेला आव्हान दिले तर आम्ही त्याला गाडून टाकू, असा इशारा शिवसेना नेते, पर्यावरणमंत्री रामदास कदम यांनी दिला आहे. मित्रपक्ष सोबत आले तर ठिक, नाहीतर त्यांनाही विरोधकांप्रमाणे उखडून टाकू, अशी दर्पोक्ती भाजपाध्यक्ष अमित शहा यांनी दोन दिवसांपूर्वी लातूरमध्ये केली होती. त्यावर संताप व्यक्त करताना रामदास कदम यांनी, आम्हाला आव्हान देणाऱ्यांनाच गाडून टाकू असा इशारा दिला. देशभरात मोदी लाट असताना राज्यात शिवसेनेचे ६३ आमदार निवडून आले आहेत. आता तर कोणतीही लाट नाही हे लक्षात ठेवा, असा टोलाही त्यांनी हाणला.

गुजरातमधे भाजप नेत्याची ट्रेनमध्ये गोळ्या घालून हत्या



अहमदाबाद, दि. ८ (वृत्तसंस्था) – गुजरातमधील भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार जयंती भानुशाली यांची अज्ञात व्यक्तींनी आज पहाटे धावत्या ट्रेनमध्ये हत्या केल्याचे समोर आले आहे. भूज-दादर एक्स्प्रेसमध्ये प्रवास करणारे भानुशाली (५३) भूज येथून अहमदाबादकडे परतत असताना ही घटना घडली.

एका महिलेने बलात्काराचा आरोप केल्यावर जुलै २०१८ मध्ये जयंती भानुशाली यांनी गुजरात भाजपचे उपाध्यक्षपद सोडले होते. तथापि सदर महिलेने तक्रार मागे घेतल्यावर गुजरात उच्च न्यायालयाने त्यांच्यावरील खटला रद्द केला होता. भानुशाली हे कच्छमधील अब्दासा मतदारसंघातून २००७ ते २०१२ दरम्यान विधानसभेवर निवडून गेले होते.

भानुशाली यांना मारेकऱ्यांनी गांधीधाम आणि सुरजबारी स्थानकादरम्यान गोळ्या घातल्या असाव्यात, असा अंदाज मोरबी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक करणराज वाघेला यांनी व्यक्त केला. ट्रेन मोरबीतील मालिया स्थानकावर थांबल्यावर भानुशाली यांचा मृतदेह आढळला. प्राथमिक चौकशीनुसार त्यांच्यावर दोन गोळ्या झाडल्याचे दिसून आले. याशिवाय ट्रेनच्या डब्यात काडतुसाच्या पुंगळ्या पोलिसांना आढळल्या.

दत्ता पडसलगीकर आणखी दीड वर्ष पोलीस महासंचालक

सरकारचे हायकोर्टात प्रतिज्ञापत्र, आज पुन्हा सुनावणी

मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी) – राज्याचे पोलीस महासंचालक दत्ता पडसलगीकर हे पोलीस दलात प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यांच्या सेवेला मुदतवाढ देणे गरजेचे होते. म्हणूनच जून २०२०पर्यंत त्यांना पोलीस महासंचालक पदावर ठेवण्याचा प्रस्ताव सरकारने तयार केला आहे, अशी माहिती केंद्रीय गृह खात्यातर्फे आज हायकोर्टात देण्यात आली.

पोलीस महासंचालक दत्ता पडसलगीकर हे ऑगस्ट २०१८च्या अखेरीस सेवानिवृत्त झाले होते. तेव्हा त्यांना शासनाने तीन महिन्यांची मुदतवाढ दिली. नोव्हेंबरअखेरीस ही मुदतवाढ संपल्याने शासनाने त्यांना आणखी तीन महिन्यांची मुदतवाढ दिली. नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस राज्य सरकारने पडसलगीकर यांना पुन्हा मुदतवाढ दिली असून ते फेब्रुवारी २०१९च्या अखेरीस सेवानिवृत्त होणार आहेत. परंतु राज्य सरकारने पक्षपातीपणा करत पडसलगीकर यांना मुदतवाढ दिली आहे.

ही मुदतवाढ रद्द करण्यात यावी तसेच मुदतवाढ देण्याचा निर्णय घेणाऱ्यांची न्यायालयीन चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करत ॲड. आर.आर. त्रिपाठी यांनी हायकोर्टात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती नरेश पाटील आणि न्यायमूर्ती एन.एम. जामदार यांच्या खंडपीठासमोर आज सुनावणी घेण्यात आली.

वादग्रस्त नागरिकता दुरुस्ती विधेयकाला लोकसभेची मंजुरी

नवी दिल्ली, दि. ८ (विशेष प्रतिनिधी) – पाकिस्तान, अफगाणिस्तान व बांगलादेशातून हिंदुस्थानात आलेल्या हिंदू, शीख, जैन, पारशी, बौद्ध व ख्रिश्चन या अल्पसंख्याक धर्माच्या आश्रितांना हिंदुस्थानचे नागरिकत्व देण्याची तरतूद करणारे वादग्रस्त नागरिकता दुरुस्ती विधेयक आज लोकसभेने आवाजी मतदानाने मंजूर केले. शिवसेनेसह अनेक मित्रपक्षांनी, विरोधी पक्षांनीही या विधेयकाविरोधात आवाज उठवला होता, मात्र आवाजी मतदानाद्वारे या विधेयकाला आज लोकसभेने मंजुरी दिली.

पाकिस्तान, अफगाणिस्तान व बांगलादेशातून हिंदुस्थानात शरणार्थी म्हणून आलेल्या नागरिकांना सहा वर्षे वास्तव्यास पूर्ण झाली असतील तर त्यांना हिंदुस्थानचे नागरिकत्व बहाल करण्याचा वादग्रस्त निर्णय केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने घेतला आहे. या निर्णाचे देशभर तीव्र पडसाद उमटले असून आसाममध्येच भाजपचा मित्रपक्ष असलेल्या आसाम गण परिषदेने सरकारच्या निर्णयाविरोधात आसाममधील भाजप सरकारमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे.

जाणीवपूर्वक भ्रम निर्माण केला जातोय – राजनाथ

नागरिकता दुरुस्ती विधेयक हे केवळ आसामपुरते मर्यादित नसून देशाच्या दूरवर दिल्ली, गुजरातमध्ये राहणाऱ्या आश्रितांनाही त्याचा लाभ होईल. पाकिस्तानमध्ये अल्पसंख्याकांच्या हक्कांची पायमल्ली होते. अफगाणिस्तान व पाकिस्तानातही अशा प्रकारच्या घटना उघड झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर अल्पसंख्याक नागरिकांना हिंदुस्थानशिवाय सुरक्षित पर्याय नाही.

विधेयक भुमिपुत्रांच्या विरोधातील - शिवसेनेची टीका

नागरिकता दुरुस्ती विधेयक हे आसाममधील स्थानिक भूमिपुत्रांच्या विरोधात आहे. या विधेयकासंदर्भात आसाम गण परिषदेच्या नेत्यांनी नुकतीच शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली आहे. शिवसेना कायमच भूमिपुत्रांच्या पाठीशी असून हे विधेयक म्हणजे 'असूनी खास मालक घरचा चोर म्हणती त्याला' अशा पद्धतीचे आहे, अशी टीका शिवसेनेने या विधेयकावर केली. घुसखोरांचा प्रश्न गंभीर असून मुंबई व महाराष्ट्राने त्याचे गंभीर परिणाम भोगलेले आहेत. बांगलादेशी नागरिकांची नावे आज मतदार यादीत दिसत आहेत. आजच्या विधेयकामुळे हिंदुस्थानचे नागरिक होणारी मंडळी उद्या मतदार यादीतही दिसतील. त्यांनाही मतदानाचा अधिकार मिळेल. त्यामुळे स्थानिक भूमिपुत्रांच्या हक्कांचा संकोच करून त्यांची गळचेपी करण्यापेक्षा मूळ समस्यांचे निराकरण करा, अशी भूमिका शिवेसना खासदार अरविंद सावंत यांनी या विधेयकावरील चर्चेत बोलताना मांडली.

कर्नाटकात भाजप आमदाराने जाळून घेतले

बंगळुरू, दि. ८ (वृत्तसंस्था) – कर्नाटकात भाजप आमदाराने अंगावर पेट्रोल टाकून जाळून घेतल्याचे समोर आले आहे. अवैध वाळू उपसाप्रकरणी पकडलेले ट्रॅक्टर सोडविण्यासाठी या महाशयाने चक्क पोलीस ठाण्यात आत्महत्येचा प्रयत्न केल्याने खळबळ उडाली.

कर्नाटकातील चित्रदुर्ग जिल्ह्यातील होसदुर्ग पोलीस ठाण्यात भाजप आमदार जी. शेखर यांनी केलेल्या या प्रकारामुळे पोलीस ठाण्यात समर्थकांनी गोंधळ घातला. शेखर यांच्या कानात व डोळ्यात पेट्रोल गेल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. माजी मुख्यमंत्री व भाजप प्रदेशाध्यक्ष बी. एस. येदीयुरप्पा यांनी रुग्णालयात धाव घेत आमदाराच्या प्रकृतीची चौकशी केली.

पोलिसांवर भ्रष्टाचाराचा आरोप

भाजप आमदार जी. शेखर यांच्यासह आमदार चंद्रप्पा यांनी पोलिसांवर भ्रष्टाचाराचा आरोप केला आहे. सामान्य नागरिकांवर गुन्हे दाखल करण्याचे काम पोलीस करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागामार्फत
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, सांगली
यांचेमार्फत आयोजित
Umed
जिल्हास्तरीय दख्खन जत्रा २०१९ विक्री व प्रदर्शन
ग्रामीण भागातील महिला स्वयंसहाय्यता समूहांनी उत्पादीत केलेल्या वस्तुचे जिल्हास्तरीय प्रदर्शन, विक्री व खाद्य महोत्सव
• दिनांक ९ जानेवारी ते १३ जानेवारी २०१९ • वेळ : सकाळी १० ते रात्री १० पर्यंत
• स्थळ : पोलिस कवायत मैदान, इस्लामपूर ता. वाळवा. जि. सांगली.

प्रदर्शन कालावधीत रोज सायंकाळी ६ ते ९ या वेळेत रसिकांसाठी खास मनोरंजनाचे कार्यक्रम
सांगली जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील महिला स्वयंसहाय्यता समुहांची उत्पादने आपण खरेदी करुन त्यांना प्रोत्साहित करावे व त्यांचा आत्मविश्वास वाढवावा. या प्रदर्शन व व विक्री महोत्सवात आपण आपले कुटुंबियांसह, मित्रमंडळीसह उपस्थित राहणेबद्दल आपणास आगत्याचे निमंत्रण आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या मुख्य अर्थतज्ज्ञपदी गीता गोपीनाथ

वॉशिंग्टन, दि. ८ (वृत्तसंस्था) – आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आयएमएफ) या संस्थेवर मुख्य अर्थतज्ज्ञ म्हणून हिंदुस्थानातील म्हैसूर येथे जन्मलेल्या गीता गोपीनाथ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या पदावर नियुक्त होणाऱ्या त्या पहिल्या महिला आहेत. गेल्या आठवड्यात गीता गोपीनाथ मुख्य अर्थतज्ज्ञपदावर रुजू झाल्या. गीता गोपीनाथ (४७) या हार्वर्ड विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागात प्राध्यापक होत्या. मॉरिस ऑब्स्टफेल्ड यांच्या जागी त्यांची नियुक्ती झाली आहे. ३१ डिसेंबर रोजी ऑब्स्टफेल्ड निवृत्त झाले. गोपीनाथ या आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या ११ व्या मुख्य अर्थतज्ज्ञ आहेत.

नगर परिषद, अंबाजोगाई

ई-निविदा क्र. १३, बांधकाम विभाग/२०१८-२०१९

अंबाजोगाई नगर परिषद यांच्या वतीने स्वच्छ महाराष्ट्र अभियानअंतर्गत खालील कामांसाठी नोंदणीकृत कंत्राटदार/संस्था यांच्याकडून BOQ नमुन्यात ई-निविदा मागविण्यात येत आहेत. तरी कंत्राटदार/संस्था यांनी दि. २४/०१/२०१९ वेळ - १५.०० वाजेपर्यंत ई-निविदा भराव्यात. सविस्तर माहिती महाराष्ट्र शासनाच्या http:mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ०९/०१/२०१९ रोजी ११.०० वाजेपासून दि. २४/०१/२०१९ रोजी ११.०० वाजेपर्यंत पाहता व डाऊनलोड करता येईल.

अ.क्र.	कामाचा प्रकार	अंदाजित किंमत (प्रतिमहिना)	बयाणा रक्कम 1%	अनामत रक्कम		कामाचा कालावधी	कोरी निविदा किंमत
				कामाच्या वेळी 1%	बिलातून कपात 3 % (प्रत्येक महिन्याच्या बिलातून)		
१	अंबाजोगाई शहरात प्रभाग क्र. १ ते १४ घरोघरी कचरा उचलणेकरिता स्वच्छता सेवा पुरविणे.	१०५५९००/-	१२६७०८/-	१२६७०८/-	३१६७७/-	१२ महिने	३०००/-
२	अंबाजोगाई शहरातील प्रभाग क्र. १ ते १४ मधील मोठे नाले व छोट्या नाल्यांतील गाळ दैनंदिन उपसा करून वाहतूक करणेकरिता सेवा पुरविणे.	१०७५१०४/-	१२९०१२/-	१२९०१२/-	३२२५३/-	१२ महिने	३०००/-
३	अंबाजोगाई शहरातील प्रभाग क्र. १ ते १४ मध्ये आरोग्यविषयक सेवा पुरविणे.	२३१६४०/-	२७७९६/-	२७७९६/-	६९४८/-	१२ महिने	२०००/-
४	सर्व्हे नं. १७ येथे नगर परिषदेच्या यांत्रिक कम्पोस्ट खत प्रकल्प चालविणे व गांडूळ खत प्रकल्प चालविणेसाठी सेवा पुरविणे.	३५२१७०/-	४२२६०/-	४२२६०/-	१०५६३/-	१२ महिने	२०००/-

स्वा./-
(डॉ. एस. टी. जगताप)
मुख्याधिकारी
नगर परिषद, अंबाजोगाई

स्वा./-
(सारंग अरुणराव पुजारी)
उपाध्यक्ष
नगर परिषद, अंबाजोगाई

स्वा./-
(सौ. रचना मोदी)
अध्यक्षा
नगर परिषद, अंबाजोगाई

नोट :- (१) सर्व पात्र इच्छुक कंत्राटदार/संस्था यांनी www:mahatenders.gov.in या संकेतस्थळावर नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे. (२) ई-निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी कंत्राटदाराने प्रथम डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. (३) निविदातील B-1 नमुन्यातील सर्व अटी कंत्राटदाराला बंधनकारक राहतील. (४) सदरील काम करताना कोणत्याही प्रकारची अग्रिम रक्कम दिली जाणार नाही. (५) सदरील काम दिलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे. (६) निविदेतील अटी-शर्तीत बदल करण्याचा तसेच कोणतेही कारण न देता निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार नगर परिषद, अंबाजोगाईने राखून ठेवला आहे. (७) जीएसटीच्या नियमानुसार देयकातून कर आकारण्यात येईल.

कोटक महिंद्रा बँक लिमिटेड

स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

नोंदणीकृत कार्यालय : २७ बीकेसी, सी २७, जी - ब्लॉक, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पू.), मुंबई, महाराष्ट्र, पिनकोड - ४०० ०५१.
शाखा कार्यालय : झोन २ ज्ञाती युनिट्री, ४ था मजला, येरवडा, पुणे-नगर महामार्ग, पुणे - ४११ ००६.

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचन सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदींअंतर्गत स्थावर मालमत्तांच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना खालील तक्त्यामध्ये दिलेल्या तपशिलानुसार आम जनतेस व विशेषत: कर्जदार व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, प्रतिभूत धनको अर्थात कोटक महिंद्रा बँक लिमिटेडकडे गहाण/प्रभारित खालील विवरणीत स्थावर मालमत्तांची ज्यांचा बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे प्रत्यक्ष ताबा घेण्यात आला होता त्या मालमत्तेची आमच्या सूचनेत मागणी केल्यानुसार थकबाकी रकमेच्या वसुलीसाठी जशी आहे जेथे आहे, जशी आहे जी आहे व जी काही आहे तेथे आहे तत्त्वावर दि. १४.११.२०१८ रोजी विक्री करण्यात येत आहे.

ज्ञात भारांसमवेत, काही असल्यास, स्थावर मालमत्तेचे विवरण सर्व तो भाग व भूखंड स्थावर मालमत्तेचा पुणे कॅण्टोन्मेंट मंडळाच्या मर्यादेतील नोंदणीकरण जिल्हा, उप-निबंधक हवेली क्र. ११ पुणे यांच्या कार्यकक्षेतील पुणे कॅण्टोन्मेंट क्षेत्राच्या मर्यादेतील जनरल थिमया रोड, पुणे - ४११ ००१ येथील कॅण्टोन्मेंट क्षेत्र येथील सी. टी. एस. क्र. २३९२ व २३९३ एकूण मोजमापित अंदाजे २४,२२८.५० चौ. फूट धारक जमिनीच्या प्लॉटवर बांधकामित व कन्हैया को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी पुणे येथील कृष्ण कुंज म्हणून ज्ञात बिल्डिंगमधील ५ व्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ३६, मोजमापित अंदाजे ६५५.६० चौ. फूट अर्थात ६०.९० चौ. मीटर बिल्टअप क्षेत्र.

कर्जदार व हमीदारांचे नाव व पत्ता	१. ई-लिलावाची तारीख व वेळ, २. इरठे सादरीकरणाची अंतिम तारीख, ३. मालमत्तेच्या पडताळणीची तारीख व वेळ	१. राखीव मूल्य, २. मालमत्तेचे इरठे
श्रीम. गीता मुकेश मिस्त्री, श्री. मुकेश मिस्त्री यांची पत्नी व श्री. मुकेश निशीत मिस्त्री, श्री. निशीत मिस्त्री यांचे पुत्र, राहणार : फ्लॅट क्र. ३६, ५ वा मजला, सीटीएस क्र. २३९२/३ कृष्ण कुंज, कन्हैया को-ऑप. हा. सो., जनरल थिमया रोड, कॅम्प पुणे - ४११ ००१. कर्ज खाते क्र. : १५९०३३९९ व १५९०३०३९ एकूण थकबाकी : दि. ०४.०१.२०१९ अनुसार रक्कम रु. ५४,०८,६०६/- (रु. चोपन्न लाख आठ हजार सहाशे सहा मात्र) व दि. ०५.०१.२०१९ पासून १४% द. सा. दराने पुढील व्याज तसेच सर्व मूल्य, प्रभार व खर्च यांचे संपूर्ण प्रदान होईपर्यंत.	१. ई-लिलाव तारीख : दि. १२ फेब्रुवारी, २०१९ रोजी दु. १२.०० ते दु. १.०० दरम्यान व ५ मिनीटांच्या अमर्यादित विस्तारासह. २. केवायसीसह इरठे सादरीकरणाची अंतिम तारीख दि. ०८ फेब्रुवारी, २०१९ रोजी सायं. ५.०० पर्यंत (भा. प्र. वे.) ३. पडताळणीची तारीख : दि. ३० जानेवारी, २०१९ रोजी स. ११.०० ते दु. ४.०० दरम्यान (भा. प्र. वे.)	राखीव मूल्य रु. ३३,००,०००/- (रु. तेहत्तीस लाख मात्र) इसारा रक्कम ठेव : रु. ३,३०,०००/- (रु. तीन लाख तीस हजार मात्र) बोली विस्तार : रु. २५,०००/- (रु. पंचवीस हजार मात्रा) व सदर विस्तारित.

इसारा रक्कम कोटक महिंद्रा बँक लिमिटेडच्या नावे अहमदाबाद येथे देय स्वरूपात डीडी स्वरूपात किंवा कोटक महिंद्रा बँक लिमिटेड खाते क्र. ०६४१०१५७०२००२१ येथे एनईएफटी/आरटीजीएसद्वारे जमा करावी व आयएफएससी कोड : केकेबीके०००००९५८, शाखा नरिमन पॉइंट, मुंबई, शाखेचा सांकेतांक : ०६४१.

विक्री करावयाच्या संपत्तीसंदर्भातील कोणतेही स्पष्टिकरण/आवश्यकतेसंदर्भात कृपया संपर्क साधा : श्री. केशर सिंग (मोबाइल क्र. ०७३९१०८४७११ व ०२०-६७४४३१७७) व श्री. विलास गायकवाड (०९६०७९४६३८६ व ०२०-६७४४३१७९) व श्री. पंकज राय (मोबाइल क्र. + ९१ ७७६८००३५६७ व ०२० - ६७४४३१०७)

विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तींकरिता कृपया वेबसाइट https://kotakbank.auctiontiger.net वर दिलेली लिंक पाहा व कोटक महिंद्रा बँक वेबसाइट www.kotak.com व/वा https://kotakbank.auctiontiger.net वर प्रदानित आहे.

ठिकाण : पुणे
दिनांक : ०९.०१.२०१९

प्राधिकृत अधिकारी
कोटक महिंद्रा बँक लिमिटेडकरिता